**प्रेसनोट** दिनांक २८/१२/२०२१

लाच स्विकारले प्रकरणी पोलीस पाटील चंद्रकांत बर्गे यांचेवर कारवाई

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | पुणे परीक्षेत्र, सातारा युनिट |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | शाहुपूरी पोलीस स्टेशन गु.र.क्र.४६३/२०२१ |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ अ |
| **आरोपींचे नाव व कार्यालय** | **चंद्रकांत तुकाराम बर्गे, पोलीस पाटील,** वय ४७ वर्षे, मौजे चिंचणेर वंदन, ता.जि.सातारा - रा. चिंचणेर वंदन ता.जि.सातारा |
| **घटनास्थळ** | चकोर बेकरीच्या बाजूला, समर्थ मंदीर रोड, सातारा येथे |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | २०,०००/- रूपये |
| **लाच स्विकारली रक्कम** | १५,०००/- रुपये |
| **थोडक्यात माहीती** | तक्रारदार यांनी दि. २७/१२/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दि.२७/१२/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी व सापळा पंचनामा कारवाई दरम्यान घडलेल्या घटना, ध्वनीमुद्रीत संभाषण यावरुन मौजे चिंचणेर वंदन, ता.जि.सातारा येथील पोलीस पाटील चंद्रकांत तुकाराम बर्गे, यांनी तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असलेल्या अदखलपात्र गुन्हयामध्ये मा. कार्यकारी दंडाधिकारी, सातारा यांचे समोर होणा-या फौ.दं.प्र.सं. कलम १०७ प्रमाणे होणा-या दोन वेगवेगळया प्रतिबंधक कारवाईमध्ये एकच जामीनदार देण्याकरीता व परत त्यासंबंधाने भविष्यात परत कधीही नोटीस न निघून केस फायनल निकाली काढण्याकरीता मदत करण्यासाठी तक्रारदार यांचेकडे रु. २०,०००/- ची लाचेची मागणी करुन त्यांपैकी तडजोडीपोटी रु. १५,०००/- लाच रक्कम लाच मागणी करुन ती लाच रक्कम दिनांक २७/१२/२०२१ रोजी १६.०५ वाजता स्विकारुन वैध परिश्रममिकाहून अन्य परितोषण म्हणून आर्थिक फायदा मिळविला म्हणून त्यांचेविरुध्द तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे. |
| **सापळा पथक** | सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक तसेच मा.सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री.अशोक शिर्के, पोलीस निरीक्षक विशाल गिरी, सहा.पोलीस उपनिरीक्षक काटवटे, पो.हवा.भरत शिंदे, संजय साळुंखे, पो.ना विनोद राजे, प्रशांत ताटे, विशाल खरात, मपोना श्रध्दा माने, पो.कॉं.संभाजी काटकर, तुषार भोसले, निलेश येवले, निलेश वायदंडे व म.पो.कॉं.शितल सपकाळ सर्व नेमणुक ॲन्टी करप्शन ब्युरो, सातारा यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधीत काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्यशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता:- सि.स.नं ५२४/अ, जिल्हा कोषागार कार्यालयाजवळ, सदरबझार सातारा
संकेत स्थळ :- acbmaharashtra.gov.in
ईमेल:- dyspacbsatara@gmail.com
ऑनलाईनतक्रार ॲप :-www.acbmaharashtra.net
टोल फ्रीक्रमांक :- १०६४
दुरध्वनीक्रमांक:- ०२१६२-२३८१३९

मा. सादर

(अशोक शिर्के)
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सातारा.